शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

शिवाजी विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, **अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या** वतीने गुरूवार दिनांक ०१ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता मुख्य प्रशासकीय इमारतीमधील पोर्चमध्ये **अण्णा भाऊ साठे** यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम आयोजित केला असून **'अण्णा भाऊ साठे'** यांच्या प्रतिमेला अभिवादन मा. कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के यांचे शुभहस्ते तसेच मा. प्र-कुलगुरू (डॉ.) पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्याचा समारंभ आयोजित केला आहे. तसेच सकाळी १२.३० वाजता मराठी विभागात प्राचार्य डॉ. आनंद मेणसे, (बेळगाव) यांचे ***अण्णा भाऊ साठे जीवन आणि कार्य*** या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनींनी या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे.

समन्वयक
प्राध्यापक
मराठी विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर-४१६ ००४

जा.क्र/शिवाजी वि./मराठी अधिविभाग/ जयंती २०२४ दि. २५.०७.२०२४

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी.
२. स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.
३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव.
४. सर्व रेक्टर यांनी सदरचे परिपत्रक वसतिगृहातील नोटीस बोर्डवरती लावण्याची व्यवस्था करावी.
५. अभियांत्रिकी विभागाने कार्यक्रमांच्या ठिकाणी स्वच्छता व इतर व्यवस्था करावी.
६. उद्यान विभागाने कार्यक्रमाच्या ठिकाणी कुंड्या ठेवण्यात याव्यात.
७. जमादार यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यक टेबल स्टूल उपलब्ध करून द्यावे व कार्यक्रमाच्यावेळी मदतीसाठी एक शिपाई देण्यात यावा.
८. सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणावे.
९. इंटरनेट विभागाने सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे.

Scanned with OKEN Scanner